**प्रश्न १ला. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

१) राजकीय पक्षाची भूमिका सर्वसमावेशक स्वरुपाची असते.
२) लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.
३) चळवळीला खंबीर नेतृत्त्वाची गरज असते.
४) चळवळ हे लोकांचे विशिष्ट प्रश्नाभोवती निर्माण झालेले संघटन असते.
५) चळवळीला जनतेचा पाठिंबा असण्याची आवश्यकता नसते.
६) आदिवासी चळवळ अयोग्य आहे.
७) हरितक्रांतीनंतर शेतकरी चळवळ क्रियाशील झाली.
८) भारताच्या संविधानात स्त्रियांना सर्वच बाबतीत समान हक्क देण्यात आले आहेत.
९) पर्यावरणाचा ऱ्हास ही गंभीर समस्या आहे.
१०) डॉ. राजेंद्रसिंह राणा हे जलपुरुष म्हणून ओळखले जातात.

**प्रश्न २ रा. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) राजकीय पक्षाची भूमिका कशाप्रकारे सर्वसमावेशक स्वरूपाची असते?
२) राजकीय पक्ष धोरण ठरवताना कोणाकोणाचा विचार करतात?
३) चळवळ ही सामूहिक कृती टप्प्याटप्प्याने कशी केली जाते?
४) लोकशाहीतील चळवळीचे महत्त्व सांगा.
५) निषेध अथवा प्रतिकार करण्याचा हक्क केव्हा वापरला जातो?
६) चळवळ म्हणजे काय?
७) चळवळीला जनतेचा पाठिंबा केव्हा मिळतो?
८) भारतातील प्रमुख चळवळींची फक्त नावे सांगा.
९) आदिवासी चळवळीच्या मागण्या कोणत्या आहेत?
१०) आपल्या मागण्यांसाठी आदिवासींचा संघर्ष केव्हापासून चालू आहे?
११) शेतकरी चळवळीला मिळणारी प्रेरणा कोणाच्या विचारांतून घेतली जाते?
१२) शेतकरी चळवळ संथ होण्याचे कारण काय?
१३) हरितक्रांतीनंतर शेतकरी चळवळ अधिक क्रियाशील का झाली ?
१४) शेतकरी संघटनांच्या प्रमुख मागण्या कोणत्या आहेत?
१५) शेतकरी संघटनांची नावे लिहा.

१६) कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कामगार संघटना स्थापन झाली ? केव्हा स्थापन झाली?

१७) आजच्या कामगार चळवळीपुढे कोणत्या समस्या आहेत?

१८) स्त्री- चळवळ सुरु होण्यामागे कोणता उद्द्येश होता?

१९) स्त्री- सुधारणा चळवळीचे प्रणेते कोण?

२०) स्त्री- सुधारणा चळवळीत कोणकोणत्या सुधारणांचा समावेश होता?

२१) सध्या स्त्री- संघटनेपुढे स्त्री - विषयक कोणते विचार आहेत?

२२) स्त्री- चळवळ समोरील आजची आव्हाने कोणती आहेत?

२३) भारतात पर्यावरण विषयक कोणत्या चळवळी सक्रिय आहेत?

२४) ग्राहक संरक्षण कायदा केव्हा अस्तित्वात आला?

२५) ग्राहक चळवळ का अस्तित्वात आली?

२६) १९८० नंतरच्या चळवळींना नवसामाजिक चळवळ असे का म्हटले जाते?